# नियमित दिवाणी मुकदमा क्र.१८२/२०१६ मधील नि.२९ खालील आदेश
# (सुनिल कृष्णा उर्फ किसन कुंभार वगैरे–५ *विरुध्द* इंद्रजित सुरेश पाटील वगैरे–३ )
# [**CNR–MHSN**09000988 2016]

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केला आहे. सदर अर्जात प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादी हे आजारी नाहीत व ते न्यायालयात जबाब देणेकरिता हजर राहु शकतात. परंतु, वादी यांनी जाणुनबुजून त्यांची साक्ष टाळणेसाठी व खरी स्थिती मे.कोर्टापासून लपविण्यासाठी मुखत्यारधारकातर्फे सरतपास दाखल केला आहे. ज्या मुखत्यारधारकातर्फे सरतपास दाखल केला आहे तो मुखत्यारधारक या दाव्यामध्ये पक्षकार नाही. तसेच, मुखत्यारधारकाचा वादीचे घराण्याशी अथवा वादी यांच्याशी काही एक संबंध नाही. तसेच, सदर प्रकरणात मुखत्यारपत्रासोबत जोडलेली कागदपत्रे व मुखत्यारपत्र यामध्ये तफावत असून मुखत्यारधारक हा बोगस असणेची शक्यता आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी ही महिला असल्यामुळे ती मे.कोर्टात येवू शकत नाही हे कारण कायद्याबाह्य व चुकीचे आहे. तसेच, मुखत्यारपत्रामध्ये वादी यांचे वयोमान जास्त झाल्याचे कथन केले आहे. वास्तविक वादी यांचे वय वर्ष पाहता अ.नं.५६, ५४, ५१, ४७ अशी नमुद केलेली आहेत. सदरचे मुखत्यारधारकाला दावा मिळकतीबाबत कोणतेही वैयक्तिक ज्ञान व माहिती नाही. त्यामुळे मुखत्यारधारकाचा जबाब कायद्याने चालु शकत नाही अशी विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

२. सदर अर्जावर वादीने त्यांचे म्हणणे दिले आहे. सदर अर्जावर वादी यांनी असे अभिकथन केले आहे की, वादीतर्फे वटमुखत्यारधारक वादीचे नाममात्र असलेचे स्पष्ट कथन वटमुखत्यारपत्रामध्ये केलेले आहे. वटमुखत्यारधारकास वादी यांनी दावामिळकत, वादातीत खरेदीपत्र याबाबत पुर्ण माहिती दिलेली आहे. वादीला वटमुखत्यारधारक नेमणेचा व कोणाला नेमणेचा पुर्ण अधिकार आहे. प्रतिवादी यांनी वादातील खरेदीपत्र मान्य केले असून कैफियत कलम २० मध्ये किसनचा हिस्सा प्रतिवादी क्र.१ चे हिस्सेत घालणेत येणेबाबत विनंती केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्र.१ यांनी असे युक्तीवाद केला आहे की,

मुखत्यारधारकाला वादीतर्फे पुरावा देण्याचा अधिकार नाही. कारण मुखत्यारधारकाला दाव्याबाबत काही माहिती नाही. तसेच, वादी यांनी स्वतःची साक्ष टाळणेसाठी जाणुनबूजून मुखत्यारधारकातर्फे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या युक्तीवादाला विसंगती देणेकरिता मा.सर्वोच्च न्यायालय यांचे प्रवाहनपत्र दाखल केले आहे. तो प्रवाहनपत्र सदर अर्जास विसंगती देत नाही. याऊलट वादीने असा युक्तीवाद केला आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३ नियम २ प्रमाणे वादीला मुखत्यारधारक नेमण्याचा अधिकार आहे. म्हणुन वादीने सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावे अशी विनंती केली आहे.

४. सदर अर्जाचे व युक्तीवादाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी वयस्कर असल्यामुळे त्यांनी मुखत्यारधारकाची नेमणुक केली आहे. जर मुखत्यारधारकांनी सदर प्रकरणात साक्ष दिली तर प्रतिवादी क्र.१ चे काहीही नुकसान होणार नाही. तसेच, दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३ नियम २ प्रमाणे वादीला मुखत्यारधारकाची नियुक्ती करणेचा पुर्ण अधिकार आहे की, तो त्याचा दावा चालविण्यासाठी मुखत्यारधारकाची नियुक्ती करु शकतो. सबब, या सर्वांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेच्या निष्कर्षास मी आले आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

**:: आदेश ::**

प्रतिवादी क्र.१ यांचा नि.२९ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

**तासगांव.** **(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**दि.२४.०७.२०१९** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तासगांव.**